जिल्हा परिषद, बुलडाणा
(ग्रामपंचायत विभाग)

## पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनाः-

- **योजनाची वैशिष्टयेः-** ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०१० अन्वये पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना सुरू करण्यात आली आहे.

  महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास (Sustanable Village Development) घडवून आणण्याकरीता ग्रामविकासाची दिशा ठरविण्याची गरज आहे. यासाठी शासनाने राज्यात ग्रामोत्थाचा त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्याचे ठरविले असून त्यात १) उच्च प्रतिच्या भौतिक व मूलभूत सुविधा २) दर्जेदार सामाजिक मूलभूत सुविधा ३) मूल्यवर्धित स्थानिक रोजगार व स्वयं रोजगार निर्मिती ही त्यांची तीन सुत्रे आहेत त्यापैकी लोक सहभागातून शासन सहकार्याने उच्चप्रतीच्या मूलभूत सुविधांचा हा कार्यक्रम आहे. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करूनच समृध्द व संपत्र गावांची निर्मिती ही काळाची गरज आहे.ग्रामपातळीवर नियोजन करून अंमलबजावणी केल्यास पर्यावरण संतुलित गाव निर्माण झाल्यावर त्यांचे सातत्यही टिकविता येईल. यासाठी ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित गाव करण्यासाठी पावले उचलतील त्या ग्रामपंचायतींना तांत्रिक व प्रशासकीय पाठबळ आणि आर्थिक प्रोत्साहन देवून, त्याद्वारे गावातील सार्वजनिक, सामूहिक व कौटुंबिक मूलभूत भौतिक सुविधा व जीवनावश्यक साधने पर्यावरण केंद्रीत कार्यक्रम घेऊन विकसीत करण्याची गरज आहे.

- **ग्रामपंचायत निवडीचे निकषः-** सदर योजना वैयक्तिक स्वरूपाची नसून लोकसहभागाद्वारे गावाचा विकास करण्याचे दृष्टिने अंर्तभूत आहे.

| अ.क्र. | वर्ष | योजनेचे निकष | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वृक्ष लागवड (लोकसंख्येचे प्रमाणात ) | शौचालय | क्षेत्रफळा-वर आधारीत कर वसूली (थकबाकीसह) | प्लास्टीक बंदी (मायक्रॉ पेक्षा कमी ) | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना सहभाग | यशवंत पंचायत राज अभियानात सहभाग | अपारंपारिक उर्जा (सौर उर्जा /CFL/LED) | बायोगॅस | घनकचरा व्यवस्थापन | सांडपाणी व्यवस्थापन |
| १ | प्रथम वर्ष | ५०% | ६०% | ६०% | ५० | भाग घेणे | भाग घेणे | - | - | - | - |
| २ | द्वितीय वर्ष | ७५% | ७५% | ८०% | ५० | ५०% | ५०% | ५० % | १ % | ५०% | ५०% |
| ३ | तृतीय वर्ष | १००% | १००% | ९०% | ५० | ६०% | ६०% | १००% | २% | १००% | ७५% |

- **योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभांची माहिती:-** या योजने अंतर्गत योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना सुरूवातीस तीन वर्षात खालील प्रमाणे निधी कामगिरीच्या सातत्यानुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र. | लोकसंख्या | कामगिरीच्या प्रमाणात देय अनुदान (लक्ष) |
|---|---|---|
| १ | १०००० पेक्षा जास्त | रू. ३०.०० (दरवर्षी १०.०० लक्ष ) |
| २ | ७००१ ते १०००० पर्यंत | रू. २४.०० (दरवर्षी ८.०० लक्ष ) |
| ३ | ५००१ ते ७००० | रू १५.०० (दरवर्षी ५.०० लक्ष ) |
| ४ | २००१ ते ५००० | रू. १२.०० (दरवर्षी ४.०० लक्ष ) |
| ५ | १००१ ते २००० | रू. ९.०० (दरवर्षी ३.०० लक्ष ) |
| ६ | १००० पर्यत लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना | रू.६.०० (दरवर्षी २.०० लक्ष ) |

- **अर्जाचा नमूना:** अधिक माहिती करीता ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम-२६१०/ प्र.क्र. १/पंरा-४, दिनांक १८ ऑगस्ट, २०१० पाहवा.